

'झीपीटीम' कार्यालयाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याहस्ते झाले. यावेळी डॉ. विलास नांदवडेकर, शंकर पाटील आदी उपस्थित होते.

# 'झीपीटीम' विकासाला नवीन दिशा देईल : शिर्के

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : व्यावसायिकांच्याहष्टीने पर्सन टू पर्सन आऊटसोर्सिंग सेवा एकाच छताखाली मिळणे ही काळाजी गरज असून, 'झीपीटीम' कंपनीने सुरू केलेले कार्यालय कोल्हापूरच्या विकासाला नवीन दिशा देईल, असा विश्वास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केला.

आय.टी. पार्क येथे अद्ययावत सेवा-सुविधा देणाऱ्या झीपीटीमच्या टेक्नोलॉजी सेंटरचे उद्घाटन डॉ. शिर्के यांच्याहस्ते झाले, यावेळी ते बोलत होते. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेर, 'झीपीटीएम'चे संस्थापक-चेअरमन वसंत मनमाडकर, एस. एच. पी. प्रॉपर्टीचे चेअरमन शंकर पाटील, 'झीपीटीम'चे मुख्य कार्यकारी अधिकारी राम पाटील, मौक्तिक पाटील, श्रीपाद बरिदे, रवींद्र खेबूडकर, उपनिबंधक महेश कदम आदी उपस्थित होते.

01 MAR 2021 पुढारी

जनसंपर्क
शिवाजी विद्यापीठ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ, सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट यांच्यातील सामंजस्य करारप्रसंगी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र- कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टचे जनरल प्रदीप सेक्रेटरी मांजरेकर. (छाया : पप्पू अत्तार)

# शिवाजी विद्यापीठाशी सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टचा सामंजस्य करार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट मुंबई व शिवाजी विद्यापीठ यांच्यात गुरुवारी सामंजस्य करार करण्यात आला.

सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट संस्था व शिवाजी विद्यापीठ यांच्यातील सामंजस्य करारामुळे उद्योजक निर्माण करण्यासाठी प्रयत्न होणार आहेत. ग्रामीण भागातील युवकांना उद्योजक बनविण्यासाठी मार्गदर्शन, प्रशिक्षण व संशोधनासाठी करारामुळे मदत होणार आहे. उद्योगनिर्मिती क्षेत्रातील संशोधनास चालना देण्यासाठी करार उपयुक्त ठरणार आहे. कौशल्य व उद्योजकता क्षेत्रात करिअर करावयाचे आहे, अशा विद्यार्थ्यांसाठी कराराच्या माध्यमातून नव्या संधी उपलब्ध होणार आहेत.

उद्योजकांना खुल्या अर्थव्यवस्थेच्या स्पर्धेत टिकाव धरण्यासाठी नवे तंत्रज्ञान आत्मसात करून त्यांच्यापर्यंत पोहोचविणे, कच्च्या मालापासून दर्जेदार उत्पादनाची निर्मिती करणे, देशांतर्गत व देशाबाहेरील नवीन उद्योजक, तंत्रज्ञ व तंत्रज्ञान निर्माण करणे सामंजस्य कराराचा उद्देश आहे.

दोन्ही संस्थांच्या माध्यमातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विद्यापीठे, महाविद्यालयांबरोबर संयुक्त पदवी कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. सामंजस्य करारावर स्वाक्षरीप्रसंगी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र- कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टचे सेक्रेटरी जनरल प्रदीप मांजरेकर, हर्षवर्धन भुरके, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. ए. एम. गुरव उपस्थित होते.

# विद्यापीठाकडून 'नॅक'ची जय्यत तयारी

कोल्हापूर : 'नॅक'च्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठातील अधिविभागांची अॅकेडमिक ऑडिटची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. विद्यापीठाकडून 'नॅक'ची जय्यत तयारी सुरू आहे. विद्यापीठाची 'नॅक'ची मुदत डिसेंबर २०१९ मध्ये संपली आहे. कोरोनाच्या संसर्गामुळे गेल्या वर्षभरापासून 'नॅक' मूल्यांकनासंदर्भात नियोजन सुरू आहे. १५, १६ व १७ मार्च रोजी नॅक बंगळूरची पिअर टीम विद्यापीठास भेट देऊन पाहणी करणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत विभागप्रमुखांनी नुकतेच विभागांचे सादरीकरण केले आहे. विद्यापीठ परिसर सुशोभीकरणाचे काम लवकरच हाती घेण्यात येणार असल्याचे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख यांनी सांगितले.

# विद्यापीठ प्रथम वर्ष, प्रथम सत्र परीक्षा अर्ज प्रक्रियेस आजपासून प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने प्रथम वर्ष, प्रथम सत्र नियमित विद्यार्थी व थेट द्वितीय वर्षाकरिता प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० परीक्षेसाठी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेस सोमवार (दि. १) पासून सुरुवात होणार आहे. परीक्षा विभागाने परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा जाहीर केल्या आहेत. विद्यार्थ्यांना १ ते ८ मार्च नियमित शुल्क, १० ते १३ मार्च विलंब शुल्क व त्यानंतर १६ ते १८ मार्चदरम्यान अतिविलंब शुल्काने अर्ज करता येणार आहेत. महाविद्यालयांना विद्यापीठात १० ते २० मार्चपर्यंत विद्यार्थ्यांच्या याद्या सादर करता येणार आहेत.

# इंजिनिअरिंग, लॉ, फार्मसीच्या परीक्षा क्लस्टर पद्धतीने

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२० मधील इंजिनिअरींग, फार्मसी, लॉ, आर्किटेक्चर, एज्युकेशन, मॅनेजमेंट या अभ्यासक्रमांच्या परीक्षा क्लस्टर पद्धतीने घेण्यात येणार आहेत. परीक्षा विभागाकडून याबाबतचे नियोजन सुरु झाले आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पदवी, पदव्युतर विविध अभ्यासक्रम परीक्षेच्या अनुषंगाने विद्यापीठाकडून तयारी सुरु आहे. ६२१ परीक्षेसाठी सुमारे विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे दोन लाखांहून अधिक विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन देण्याचे पर्याय उपलब्ध आहेत. एमसीक्यू पद्धतीने ५० गुणांची २५ बहुपर्यायी प्रश्नांची एक तासाची परीक्षा घेतली जाणार आहे. इंजिनिअरींग,फार्मसी, लॉ, आर्किटेक्चर, एज्युकेशन, मॅनेजमेंट या अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेण्यासाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एका महाविद्यालयाची क्लस्टर महाविद्यालय म्हणून निवड केली जाणार आहे. त्या महाविद्यालयांवर परीक्षा, वेळापत्रक नियोजन व इतर महाविद्यालयांना मार्गदर्शनाची जबाबदारी असणार आहे. परीक्षा अर्ज भरण्याचा कालावधी कमी असल्याने विद्यार्थ्यांनी वेळेतच परीक्षा अर्ज भरावेत. महाविद्यालय, अधिविभागात मोबाईल क्रमांक अपडेट करावेत, असे आवाहन पळसे यांनी केले आहे.

### आज परीक्षेसंदर्भात अंतिम धोरण ठरणार

आंतर विद्या शाखा अधिष्ठता डॉ. मेघा गुळवणी यांच्या अध्यक्षतेखाली आज (दि. १) परीक्षा समितीची बैठक होणार आहे. या बैठकीत परीक्षेसंदर्भात अंतिम निर्णयानंतर परीक्षा कशा पद्धतीने घेतली जाणार याचे धोरण जाहीर होणार आहे.

# इंजिनिअरिंग, लॉ, फार्मसी परीक्षा क्लस्टर पद्धतीने



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० मधील इंजिनिअरिंग, फार्मसी, लॉ, आर्किटेक्चर, एज्युकेशन, मॅनेजमेंट या अभ्यासक्रमांच्या परीक्षा क्लस्टर पद्धतीने घेण्यात येणार आहेत. परीक्षा विभागाकडून याबाबतचे नियोजन सुरू झाले आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पदवी, पदव्युतर विविध अभ्यासक्रम परीक्षेच्या अनुषंगाने विद्यापीठाकडून तयारी सुरू आहे. ६२१ परीक्षांसाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे दोन लाखांहून अधिक विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन

## परीक्षा विभागाकडून नियोजन सुरू

देण्याचे पर्याय उपलब्ध आहेत. प्रत्येक विषयाच्या अभ्यास मंडळाने ठरवून दिलेल्या अभ्यासक्रमावर आधारित परीक्षा होणार आहेत.

एमसीक्यू पद्धतीने ५० गुणांची २५ बहुपर्यायी प्रश्नांची एक तासाची परीक्षा घेतली जाणार आहे. परीक्षा अर्ज भरण्याचा कालावधी कमी असल्याने विद्यार्थ्यांनी वेळेतच परीक्षा अर्ज भरावेत. महाविद्यालय, अधिविभागात मोबाईल क्रमांक अपडेट करावेत, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी केले आहे.

## डॉ. मेघा गुळवणी समितीची आज बैठक

पदवी, पदव्युत्तरच्या परीक्षा कशा पद्धतीने घ्यावयाच्या याच्या नियोजनासाठी सोमवारी (दि. १) डॉ. मेघा गुळवणी यांच्या अध्यक्षतेखालील समितीची बैठक होणार आहे. बैठकीतील शिफारशी अधिकार मंडळासमोर सादर करण्यात येतील. त्यानंतर परीक्षेबाबतचा अंतिम निर्णय होईल.

# डॉ. आर. के. कामत यांची निवड



डॉ. कामत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील संगणकशास्त्र विभागाचे अधिविभागप्रमुख डॉ. आर. के. कामत यांची ऑस्ट्रेलियातील मेलबर्न येथील विक्टोरियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या विद्यापीठात व्यवस्थापन परिषदेसाठी माहिती व तंत्रज्ञान या विषयात मानद प्राध्यापक म्हणून निवड झाली. डॉ. कामत शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान या विषयांचे प्रभारी अधिष्ठाता आहेत. विक्टोरियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी ही जगातील माहिती व तंत्रज्ञान विषयातील अग्रगण्य संस्था मानली जाते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# 'युसिकची उपकरणे शिक्षणासह औद्यागिक क्षेत्रासाठी उपयोगी '

कोल्हापूर : विद्यापीठाच्या युसिक, सीएफसीमधील अत्याधुनिक उपकरणे, येथे चालणारे उपक्रम केवळ शैक्षणिक क्षेत्रासाठीच नव्हे, तर औद्योगिक तसेच तंत्रज्ञान निर्मितीच्या कामासाठी नक्कीच उपयुक्त ठरणारी आहेत. त्या दृष्टीने संशोधकांसोबतच औद्योगिक क्षेत्राने येथील सुविधेचा अधिकाधिक उपयोग करून घ्यावा, असे प्रतिपादन विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे प्रा. पी. एन. वासंबेकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील शास्त्रीय उपकरणे केंद्र (युसिक) व सर्वसाधारण सुविधा केंद्र (सीएफसी) यांच्यामार्फत चार दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेला प्रारंभ झाला. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या स्ट्राईड कार्यक्रमांतर्गत ही कार्यशाळा घेण्यात आली. याप्रसंगी ते बोलत होते. सीएफसी विभागप्रमुख प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी विभागातील उपकरणांची माहिती दिली. पदार्थविज्ञान अधिविभागाच्या प्रा. विजया पुरी, प्रा. आर. जी. सोनकवडे, आर. आय. टी., इस्लामपूरचे डॉ. ए. बी. काकडे, वैज्ञानिक अधिकारी डॉ. जे. बी. यादव यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत युसिक व सीएफसीमधील उपलब्ध विविध वैज्ञानिक उपकरणांची, विशेषतः एक्स-रे डिफ्रॅक्टोमीटर (एक्सआरडी) आणि व्हेक्टर नेटवर्क एनालायझर (व्हीएनए) या आधुनिक उपकरणांची माहिती देण्यात येणार आहे.

# विकासामध्ये पालकांची भूमिका महत्त्वाची : जाधव

**राशिवडे : प्रतिनिधी**

महाविद्यालयांच्या विकासामध्ये माजी विद्यार्थी व पालकांची भूमिका महत्त्वाची असते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. अधिकराव जाधव यांनी केले. कुरुकली (ता. करवीर) येथील भोगावती महाविद्यालयात झालेल्या माजी विद्यार्थी व पालक मेळाव्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी भोगावती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष जयसिंगराव हुजरे होते. प्राचार्य डॉ. दिनकर पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. कासिम पठाण यांनी परिचय करून दिला. बबन पाटील, मानसिंग पाटील आदींची भाषणे झाली. प्रा.संजय साळोखे यांनी आभार मानले. प्रा. पवन पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. आबासाहेब चौगले, भगवान पाटील, प्रा. सुनील खराडे, उपप्राचार्य आर. ए. सरनोबत, आर. बी. हंकारे, प्रबंधक पी. एस. पाटील, टी. एम. चौगले, एन. एम. पाटील, आर. एन. पाटील, एस. के. परीट आदी उपस्थित होते.